# जोडपत्र-४

कार्यालयाचे नाव - *सहसंचालक व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय, नागपूर*

योजनेचे नाव - *महाराष्ट्र शिकाऊ उमेदवारी प्रोत्साहन योजना - (MAPS)*

| | | |
|---|---|---|
| १. | योजनेचा संक्षिप्त तपशिल | • शासकीय, निमशासकीय आणि खाजगी आस्थापनांमध्ये शिकाऊ उमेदवारी प्रशिक्षण योजनेअंतर्गत शिकाऊ उमेदवारांची भरती वाढवून प्रोत्साहीत करण्यासाठी "महाराष्ट्र शिकाऊ उमेदवारी प्रोत्साहन योजनेस (Maharashtra Apprenticeship Promotion Scheme-MAPS)" कौशल्य विकास, रोजगांर व उद्योजकता विभाग, शासन निर्णय क्र. आयटीआय-२०२०/प्र.क्र.१२७/व्यशि-३, दिनांक ०३/०६/२०२१ अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे.<br><br>• महाराष्ट्र शिकाऊ उमेदवारी प्रोत्साहन योजनेअंतर्गत प्रशिक्षण घेणाऱ्या शिकाऊ उमेदवारांना देय विद्यावेतनाच्या ७५ टक्के किंवा जास्तीत जास्त रुपये ५,०००/- यापैकी कमी असलेले विद्यावेतन शिकाऊ उमेदवारांना शासनातर्फे अनुज्ञेय राहील. तथापि, राष्ट्रीय शिकाऊ उमेदवारी प्रोत्साहन योजनेअंतर्गत आस्थापनांना अनुज्ञेय ठरणारी विद्यावेतन प्रतिपूर्ती आणि महाराष्ट्र शिकाऊ उमेदवारी प्रोत्साहन योजनेअंतर्गत शिकाऊ उमेदवारांना अनुज्ञेय ठरणारा विद्यावेतनाचा आर्थिक लाभ एकत्रितपणे देय एकूण विद्यावेतनाच्या ७५% पेक्षा अधिक अनुज्ञेय ठरणार नाही.<br><br>• मूलभूत प्रशिक्षण देणाऱ्या संस्थेस (Basic Training Provider) रु.२०/- प्रतितास या दराने (केंद्र शासनाकडून मिळणारी प्रतिपूर्ती रु.१५/- प्रतितास वजा करुन) जास्तीत जास्त ५०० तासांकरिता रु.२,५००/- एवढी प्रशिक्षण खर्च प्रतिपूर्ती मूलभूत प्रशिक्षण देणाऱ्या संस्थेस प्रति प्रशिक्षणार्थी अनुज्ञेय राहील.<br><br>• तसेच ज्या मूलभूत प्रशिक्षण देणाऱ्या संस्थेस (Basic Training Provider) केंद्र शासनाकडून प्रशिक्षण खर्च प्रतिपूर्ती मिळणार नाही, अशा संस्थांना रु.२०/- प्रतितास या दराने जास्तीत जास्त ५०० तासांकरिता रु. १०,०००/- एवढी |

| | | |
|---|---|---|
| | | प्रशिक्षण खर्च रक्कम प्रतिपूर्ती मूलभूत प्रशिक्षण देणाऱ्या संस्थेस प्रति प्रशिक्षणार्थी अनुज्ञेय राहील. |
| २. | योजनेचे पात्रतेचे निकष | १. ITI उत्तीर्ण प्रशिक्षणार्थी<br>२. केंद्रीय शिकाऊ उमेदवारी संकेत स्थळावर (नोंदणी कृत) महाराष्ट्र राज्याचे सर्व उमेदवार. |
| ३. | योजनेसाठी आवश्यक कागदपत्रे | विद्या वेतनासाठी प्रथम अर्ज करताना :-<br>१. शिकाऊ उमेदवारी नोंदणीकृत कराराची प्रत.<br>२. महाराष्ट्र राज्याचा उमेदवार असल्याबाबतचे अधिवास/जन्मप्रमाणपत्र<br>३. उमेदवाराच्या आस्थापनेकडून प्राप्त विद्यावेतन, बँक स्टेटमेंट किंवा पासबुकची प्रत. |
| ४. | योजनेसाठी ऑनलाईन अर्ज करण्यासाठी विभागाचे संकेतस्थळ | http://maps.dvet.gov.in |
| ५. | आवश्यक शुल्क | निशुल्क |
| ६. | शुल्क भरणा पध्दत | निशुल्क |
| ७. | योजना मंजूरीसाठी लागणारा कालावधी | १. सबंधित आस्थापनांची मंजुरी १० दिवस<br>२. सबंधित प्रादेशिक कार्यालयाची अंतिम मंजुरी १५ दिवस<br>३. मुख्य कार्यलय यांनी देयके तयार करून अधिदान व लेखा कार्यलयास सादर करणे १५ दिवस<br>४. देयके अधिदान व लेखा कार्यलयाकडून मंजुरी ७ दिवस<br>५. देयके अधिदान व लेखा कार्यलयाकडून मंजुर झाल्यानंतर सबंधित उमेदवारांच्या खात्यात थेट लाभार्थी हस्तांतरण ७ दिवस |
| ८. | योजना मंजूर करणारे सक्षम प्राधिकारी | स्तर-१: संबंधित आस्थापना<br>स्तर-२: संबंधित सहसंचालक तथा प्रशिक्षण-नि-प्रशिक्षणार्थी सह सल्लागार, प्रादेशिक कार्यालय |
| ९. | योजनेअंतर्गत तक्रार निवाराण करण्यासाठी उपलब्ध करुन दिलेले प्रणालीचे संकेतस्थळ | https://grievanceredressal.dvet.gov.in/ |

| | | |
|---|---|---|
| १०. | योजने संदर्भात तक्रार निराकरण करणारे अधिकारी | स्तर-१: सहाय्यक प्रशिक्षणार्थी सल्लागार, मुलभूत प्रशिक्षण तथा अनुषंगिक सूचना केंद्र संबंधित जिल्हा अधिकारी<br>स्तर-२: जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी तथा जिल्हा उप-प्रशिक्षणार्थी सल्लागार<br>स्तर-३: सहसंचालक तथा प्रशिक्षण-नि-प्रशिक्षणार्थी सह सल्लागार<br>स्तर-४: संचालक तथा राज्य प्रशिक्षणार्थी सल्लागार |

सहसंचालक
व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण
प्रादेशिक कार्यालय, नागपूर